प्रेसनोट

नंदुरबार
दिनांक २३/०१/२०२६

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | नंदुरबार |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | नंदुरबार शहर, पो.स्टे. गु.र.क्र. /२०२६, |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम,१९८८ |
| आरोपीचे नाव, वय व कार्यालय | **किरण गणेश पाडवी, वय ५४ वर्षे**<br>**नेमणूक— मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, वर्ग २**<br>**अति.कार्यभार— सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, नंदुरबार** |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाचेची रक्कम रु.६५,०००/— स्विकारली |
| थोडक्यात माहिती | **तक्रारदार, वय ४३ वर्षे**<br>मत्स्यव्यवसाय विभाग, कार्यालय— सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, नंदुरबार येथील दिनांक ३०/०७/२०२५ रोजीच्या जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती सभेत रंगावली तलाव, उंबर्डी, ता. नवापूर,जि.नंदुरबार येथील दि.१ जुलै,२०२५ ते ३० जून २०३० या कालावधीसाठीचा सामंजस्य करार तक्रारदार यांचेसोबत करण्यास चेअरमन, नवजीवन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादीत, खैरवे, ता.नवापूर यांना मान्यता दिली होती. सदर मान्यता आदेशाची प्रत आलोसे यांनी तक्रारदार यांना देवून मत्स्यव्यवसाय ठेका मंजूर केल्याच्या मोबदल्यात बक्षिस म्हणून १ लाख रु ची मागणी केली होती. तक्रारदार यांचेकडे एवढी रक्कम नसल्याने त्यांनी आलोसे यांना पैसे दिले नव्हते.<br>त्यानंतर आलोसे यांनी तक्रारदार यांना दिनांक ०९/०१/२०२६ रोजी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार यांन तलावात मासे न टाकल्याचे कारण सांगून तक्रारदार यांचा ठेका रद्द करुन अन्य इसमास देण्याची भिती दाखवून ठेका रद्द न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २ लाख ६५ हजार रु लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी त्यातील २ लाख रु अन्य इसमाचे बँक खात्यात ट्रान्सफर करण्यास सांगून ६५,०००/—रु. लाच रक्कम आलोसे यांनी त्यांचे सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, नंदुरबार येथील कार्यालयात स्विकारल्याने यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली. |
| सापळा कारवाई | सापळा अधिकारी व अंमलदार<br>१. पोउपअधीक्षक प्रशांत भरते<br>२. पो.नि.विकास लोंढे<br>३. सहा पोउपनि विलास पाटील<br>४. पोहवा/ ३२, देवराम गावीत<br>५. पोहवा/९६७, विजय ठाकरे<br>६. पोहवा/६७, हेमंतकुमार महाले<br>७. पोहवा/१०४८, नरेंद्र पाटील,<br>८. पोहवा/११२८, जितेंद्र महाले,<br>९. पोहवा/९६१, संदीप खंडारे<br>१०.पोना/३५६, सुभाष पावरा, सर्व नेमणूक ला.प्र.वि.नंदुरबार घटक |
| **मार्गदर्शन** | १. मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>२. मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>३. मा.श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, १२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार
संकेतस्थळ :— https://acbmaharashtra.gov.in
ई मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in / dyspacbnandurbar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— २५६४—२३१००९
व्हॉटसअ‍ॅप क्रमांक :— ९४२३५४१०६४

प्रशांत भरते
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार